**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# वाचन प्रेरणा दिन साजरा

## बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे वाचन संस्कृतीचा जागर

ग्रामोध्दार वृत्तसेवा

तारळे : भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (छडड), एन.सी.सी. (छउउ) आणि आय.क्यू.ए.सी. (खटउ) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए पी.जे.कलम यांच्या प्रतिमा पूजनाने झाली . भारतीय संविधानातील उद्देशिका, मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये यांचे सामूहिक वाचन करून करण्यात आली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांची जाणीव करून देण्यात आली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक आय.क्यू.ए.सी. समन्वयक मा. डॉ. एच. व्ही. काटे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची क्रिया नसून ती विचारप्रवृत्ती आणि विवेकशक्ती विकसित करणारे साधन आहे. तसेच त्यांनी डॉ.ए पी.जे.कलम यांच्या जीवन चरित्राचा तसेच कार्याचा आढावाघेतला व त्यांच्या आठवणी सांगितल्या

यानंतर प्रा. अनिल पाटील, ग्रंथपाल यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना चेतवली. त्यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांचा उल्लेख करताना सांगितले की, डॉ. कलाम यांचे आयुष्य हे प्रेरणेचा दीपस्तंभ आहे; त्यांचे वाचन, विचार आणि कार्य हे प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शक आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. संजीव चव्हाण, संचालक कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले, आजच्या काळात वाचनाची सवय कमी होत चालली आहे. मात्र वाचन

जी विद्यार्थ्यांना यशस्वी आणि जबाबदार नागरिक बनवते. डॉ. कलाम यांचे विचार वाचनातून आत्मसात करण्याची गरज आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. डॉ. एस. डी. पवार, प्राचार्य बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना आवाहन केले की, वाचन ही एक जीवनशैली बनली पाहिजे. दररोज काही मिनिटे चांगले वाचन केल्याने व्यक्तिमत्व अधिक प्रभावी होते.

कार्यक्रमाला प्रा अनिल पाटील , प्रा. डॉ. एल. जी. गनगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले.

या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथालय विभाग ,राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी व आय .क्यू .ए. सी.यांनी केले.

डॉ. अब्दुल कलाम यांच्या स्मृतीदिनानिमित्त साजरा झालेला वाचन प्रेरणा दिन विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा प्रसार घडविणारा ठरला. सभागृहात ज्ञान, विचार आणि प्रेरणेचे वातावरण

: सुप्रिया इनामदार

